**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**


**पोस्ट-शिर्डी-४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा- अहिल्यानगर (महाराष्ट्र)**

दुरध्वनी क्रमांक- (०२४२३) २५८८४४,२५८८२३,२५८८२७

वेबसाईट - http://www.saibabasansthan.org.in or sai.org.in

Email ID :- saiprasadalaya@sai.org.in



**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे**

# श्री साई प्रसादालयात अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनवून देणे विषयी ई-निविदा.

# सन २०२५-२६

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी ई-निविदा

## ❖ अनुक्रमणिका ❖

## सन २०२५-२६ (एका वर्षासाठी)


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १. | अनुक्रमणिका | ०२ |
| २. | श्री साई प्रसादालयाची माहीती | ०३ |
| ३. | कामाचा तपशिल | ०४ |
| ४. | निविदेच्या अटी व शर्ती | ०५ ते १४ |
| ५. | अधिकार प्रदान पत्र व निविदाधारक माहीती | १५ ते १६ |
| ६. | निविदाधारक यांचे हमीपत्र | १७ |
| ७. | **टेक्नीकल बीडसोबत ऑनलाईन स्कॅन करुन द्यावयाची माहिती (पान क्रं.१४ मुद्दा क्रं.७० अ.नं.१ ते ७ )** | **पान क्रं.१४ मुद्दा क्रं.७०** |

# श्री साई प्रसादालयाची माहीती

श्री साईंचे दर्शनासाठी राज्यातून, देशातून, परदेशातून अनेक साईभक्त येत असतात, श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना प्रसादालयात प्रसादभोजन व अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) ची सुविधा पुरविणेत येते.

श्री साई प्रसादालयाची उभारणी ०२ हेक्टर ८५ आर एवढया मोठया जागेत करणेत आलेली असून, "श्री साई प्रसादालय" ही वास्तू दि.०८ जानेवारी २००९ पासून भक्तांच्या सेवेसाठी खुली करणेत आलेली आहे. श्री साई प्रसादालयात दररोज साधारणत: अंदाजे ४५,००० ते ५०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. गर्दीमध्ये (श्रींचे तीनही उत्सव, रामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा तसेच नाताळ, दिपावली सुट्टया, सलग सुट्टया) दररोज अंदाजे ६०,००० ते ८७,००० पर्यंत साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात.

श्री साई प्रसादालयाचे कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ४ व दुपारी ३ ते रात्रौ ११ अशी असून प्रसादालय साफ सफाईची कामे ही तीनही (७ ते ३, ३ ते ११ व ११ ते ७) शिफ्टमध्ये चालतात. प्रसादभोजनामध्ये भक्तांना दोन भाजी, चपाती, भात, डाळ आणि एक गोड पदार्थ असे भोजन देण्यात येते.

श्री साई प्रसादालयामध्ये अनेक प्रकारच्या मशिनरींचा वापर करणेत येत असून त्यांचा वापर करुन प्रसादभोजन बनविणेत येत आहे. **त्याचप्रमाणे पहाटे ३ ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे तयार करण्यात येतात. अन्नपाकीटामध्ये सुकी भाजी, पुरी व बर्फी देण्यात येते. गर्दीचे प्रमाणात दररोज अंदाजे ८,००० ते १२,००० अन्नपाकीटांची विक्री करण्यात येते.**

श्री साई प्रसादालयास फुड सेफ्टीचे ISO 22000-2018 चे नामांकन मिळालेले असून, श्रींचे प्रसादालयाचे नाव हे जगविख्यात झालेले आहे. प्रसादालयाचे किचन हे मेगा किचन म्हणून संबोधले जात असून त्या स्वरुपाची माहीती नॅशनल जिओग्राफी या टिव्ही चॅनलवर दाखविण्यात आलेली आहे.

एकंदरीत श्री साई प्रसादालयास जगविख्यात मिळालेली प्रसिध्दी, फुड सेफ्टीचे ISO 22000-2018 चे नामांकन त्याचप्रमाणे दररोज मोठया प्रमाणात प्रसादभोजन घेत असलेली भक्त संख्या यादृष्टीने **सदरहु निविदेत नमूद केल्याप्रमाणे कामगार लावणे, त्यांना शासनाचे किमान वेतन ॲक्टप्रमाणे वेतन देणे, प्रॉ.फंड वेळेवर भरणे, संस्थान नियमानुसार कामगारांची विमा पॉलिसी काढणे, दिपावली सानुग्रह अनुदान देणे, गणवेष व बुट पुरविणे. इत्यादी सर्व बाबींचा विचार करुनच निविदाधारक कंपनीने निविदा भरावयाची आहे.** प्रसादालयातील अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेची कामे उत्कृष्ट होणे गरजेचे आहे. करीता सदरहु कामासाठी इकडील विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येत आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुनच निविदाधारकाने निविदा भरावी.

❖

## ❖ प्रसादालयातील कामाचे (ई-निविदाचे) स्वरुप ❖

### कामाचा तपशील

ई-निविदा भरतांना खालील मार्गदर्शन पर मुद्यांचा विचार करुन बीड ऑफ क्वॉटींटी (BOQ) ई-निविदा भरावी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने साईभक्तांसाठी सकाळी ६ ते १० या वेळेत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, साईआश्रम नं.०१, साईआश्रम नं.०२, साईनाथ मंगल कार्यालय, साईबाबा हॉस्पीटल, साईनाथ हॉस्पीटल इत्यादी ठिकाणी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) विक्री करणेत येतात.

सदरहु ई-निविदा ही अन्नपाकीटामधील अन्नपदार्थ तयार करुन पेपर पिशवीत पॅकींग करुन देण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्यात येते. ठेकेदारास अन्नपाकीटे तयार करणेकामी लागणारा कच्चा माल उदा. किराणा साहीत्य, गहु आटा, मैदा आटा, गोडतेल, कडधान्य, मसाले, पाणी, वीज, पॅकींग पिशवी, वगैरे साहीत्य तसेच तयार करणेकामी लागणारी भांडी उदा.कढई, पातेले, ट्रे वगैरे संस्थानकडून पुरविण्यात येईल. तयार अन्नपाकीटे विक्री करण्याचे काम संस्थानचे वतीने नेमून दिलेल्या विभागामार्फत करण्यात येईल. अन्नपाकीटे तयार करुन पॅकींग करणेची कामे संस्थानचे वरिष्ठ अधिका-यांमार्फत व मार्गदर्शनाखाली करावी लागणार आहेत.

दररोज साधारणत: ८,००० ते १२,००० अन्नपाकीटांची आवश्यकता असून गर्दीचे प्रमाणात यामध्ये वाढ होत असते त्यामुळे गर्दीचे प्रमाणात कामगार कामास लावून अन्नपाकीटे तयार करुन पुरविणे संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच गरज पडल्यास परिसरातील नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीमध्ये उदा.भुकंप, महापूर वगैर अशा स्वरुपाची परिस्थती निर्माण झाल्यास त्यावेळी देखील अन्नपाकीटे तयार करुन पुरवावे लागतील. या सर्व बाबींची दखल व हिशोब करुनच निविदाधारक यांनी निविदा भरावयाची आहे.

श्री साईबाबांचे श्री रामनवमी उत्सव, गुरुपौर्णिमा उत्सव, पुण्यतिथी (दसरा) उत्सव हे तीनही उत्सव मोठया उत्साहाने साजरे करण्यात येतात. उत्सव कालावधीत तिन ते चार दिवस प्रसादभोजनामध्ये भक्तांना मिष्टान्न पदार्थ देण्यात येतात. उत्सवानिमित्त संस्थान कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच आऊटसोर्स कर्मचारी यांना बुंदीप्रसाद व चिवडाप्रसाद पाकीटे तयार करुन देण्यात येतात. तसेच त्यानंतर श्रमपरिहारामध्ये मिष्टान्न पदार्थ देण्यात येतात. सदरील कामे अन्नपाकीटे ठेकेदार, चपाती/पुरी ठेकेदार, लाडू विभागाकडील लाडू, बुंदी व बर्फी ठेकेदार या तिन्ही ठेकेदारांनी ऐकमेकाच्या संगणमताने विनामुल्य करुन दयावयाचे आहेत. उत्सव कालावधीतील व श्रमपरिहार भोजनातील मिष्टान्न पदार्थ तसेच बुंदी व चिवडा बनविणेकामी ठेकेदारास वेगळा मोबदला दिला जाणार नाही. तसेच सदर मिष्टान्न बनविणेकामी लागणारा कच्चा माल उदा. किराणा साहीत्य, भांडी वीज, पाणी वगैरे सर्व साहीत्य संस्थानकडून देण्यात येईल.

त्यामुळे या सर्व बाबी विचारात घेवूनच निविदाधारक यांनी प्राईस बीडमध्ये दर **(BOQ)** दयावयाचे आहेत दर देतांना जी.एस.टी वगळून द्यावयाचा आहे. जीएसटीची रक्कम संस्थानकडून आदा करणेत येईल.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी)**

## श्री साई प्रसादालय विभागात अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी शर्ती व अटी

१. अन्नपाकीटे निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. सदरचे कामासाठी असलेली बयाणा रक्कम रु.१,४०,०००/- (अक्षरी रु.एक लाख चाळीस हजार मात्र) व टेंडर फी रु.१४,०००/-(अक्षरी रु. चौदा हजार मात्र) महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईनने जमा करावयाची आहे.

३. बयाणा रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

४. निविदाधारकांनी दरपत्रक सादर करताना जीएसटी वगळून दर सादर करावेत. जीएसटीचे दर वेळोवेळी शासनाचे नियमानूसार लागू करण्यात येतील. जी.एस.टीची रक्कम संस्थानकडून आदा करण्यात येईल.

५. सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.१० लाख असणे बंधनकारक राहील. त्यापेक्षा कमी उलाढाल असल्यास निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

६. निविदेसोबत स्कॅन करावयाची कागदपत्रे, नमुने, व इतर अटी/शर्तीचा तपशिल सोबत दिलेला आहे. त्यानूसार कळविलेल्या तारखेस व वेळेत पुर्ण माहीतीत भरलेली व मागविणेत आलेली कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणेत आलेली निविदा सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

७. कुठलीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

८. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांचाच (Technical Bid) विचार करणेत येईल.

९. उपरोक्त ई-निविदेसोबत फक्त Online Upload (स्कॅन केलेले) केलेल्या कागदपत्रांचाच विचार करणेत येईल. Hard Copy मध्ये कुठलीही कागदपत्रे स्विकारणेत येणार नाहीत.

१०. अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनविणे कामी लागणारे साहीत्य उदा. कच्चा माल गहुआटा, मैदा, तेल, इंधन, लाटणे, पोळपाट, मशिनरी वगैरे संस्थान मार्फत पुरविण्यात येईल.

११. कंत्राटदारास कोरडा गहु आटा मळून अंदाजे प्रत्येकी २५ ग्रॅम वजनाच्या ०५ नग पु-या लाटून तळणे, सुकी भाजी/उसळ, तयार करुन पिशवीत भरणे, बर्फी/शिरा बनविणे हे सर्व पदार्थ ठरलेल्या परिमाणानूसार (सुमारे २५ ग्रॅम वजनाच्या ५ पु-या, १२५ ग्रॅम भाजी व २५ ग्रॅम वजनाची बर्फी वडी किंवा शिरा) पेपर पिशवीमध्ये भरुन बंद पाकीट तयार करुन द्यावे लागेल.

१२. अन्नपाकीटामध्ये पुरी देणे बंधनकारक राहील. मात्र प्रसादालय अधीक्षक, पर्यवेक्षक सांगतील त्याचवेळी अन्नपाकीटामध्ये चपाती द्यावी लागेल.

१३. श्रींचे श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा या तिनही उत्सवामध्ये कर्मचा-यांना द्यावयाची बुंदी व चिवडा पाकीटे तसेच दिपावली रवा-लाडू प्रसाद पाकीटे प्रसादालय अधीक्षक, पर्यवेक्षक सांगतील त्याप्रमाणे अंदाजे ७ ते ०८ हजार पाकीटे भरुन पॅकींग करुन देणे बंधनकारक राहील.

१४. वरील अन्न पाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी लागणारा कच्चा माल व इंधन संस्थान तर्फे पुरविण्यात येईल. कच्च्या मालाची आवश्यकतेनुसार उपभांडारमधून वाहतुक कंत्राटदारास स्वत:चे कामगाराकडून करावी लागेल.

१५. कोणत्याही प्रकारे अन्नपाकीटातील पदार्थ खराब झाल्यास त्याची नुकसान भरपाई कंत्राटदारास भरुन द्यावी लागेल. तसेच आपल्या कर्मचा-यांकडून मालाची नासधुस झाल्यास त्याची नुकसान भरपाईची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१६. श्री साई प्रसादालय अधिक्षक, पर्यवेक्षक, लिपीक, मुकादम यांनी ठरवून दिलेल्या प्रमाणात व वेळेत अन्नपाकीटे (नाष्टा पाकीट) तयार करुन पुरवावे लागतील.

१७. उपरोक्त कामी लावलेल्या कामगारांचे कामावर देखरेख, नियंत्रण विशेषत: स्वच्छता (केस, नखे) तसेच कामाचे ठिकाणी धुम्रपान/मद्यपान/तत्सम पदार्थांचे सेवण केले जाणार नाही याची काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

१८. कंत्राटदाराने कामगांराना स्वच्छ ०२ ऍप्रन, कॅप, हॅण्डग्लोज व मास्क पुरविणे बंधनकारक आहे. मात्र गणवेषामध्ये सुसूत्रीतपणा, पॅटर्न, रंग एकसारखा असावा म्हणून संस्थान ठरवील त्याप्रमाणे कापडाचे गणवेष तयार करावे लागतील त्यासाठी येणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१९. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे नियमांमध्ये वेळोवेळी होणारे बदल (रुल्स ऍण्ड रेग्युलेशन) कंत्राटदारास मान्य राहतील व त्यांचे निर्देशानूसार स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२०. कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमण्यात आलले कंत्राटी कामगार हे भाविक प्रवृत्तीचे असले पाहीजेत. तसेच संस्थानचे दर्शनासाठी येणा-या भाविकांशी नम्रतेने व तत्परतेने सेवा देणारे असावेत. भाविकांशी उद्धट, बेशिस्त वर्तन तसेच इतर गैरशिस्तवर्तन करणारे कंत्राटी कामगारांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी सबंधीत कंत्राटदारावर राहील.

२१. कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांवर नियंत्रण (कंट्रोल) व देखरेख (सुपरविझन) ठेवणेची जबाबदारी सबंधीत कंत्राटदारावर राहील. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कामगार व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबंध राहणार नाही. त्याबाबत काही विवाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.

२२. **बिलाची पध्दत** :- मागील महिण्याची बीलाची रक्कम बील व अनुषंगीक परिपुर्ण कागदपत्रे सादर केलेनंतरच शक्यतो ३० दिवसांत आदा करण्यात येईल.

२३. कंत्राटदार अथवा त्यांचेकडील कामगारांनी संस्थानच्या आवारात कोणतेही स्वरुपाचे गैरवर्तन केले अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्यास, असे गैरवर्तन केलेले कामगार कंत्राटदाराने संस्थानला पुरवू नये. तसेच असे प्रकार वारंवार घडल्यास विना नुकसान भरपाई व विना नोटीस सबंधीत कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.

२४. कंत्राटदारामार्फत काम करत असलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य केल्यास किंवा संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपुर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

२५. कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांची निवासाची व्यवस्था संबंधीत कंत्राटदारास स्वत करावी लागेल. कामगारांची निवासव्यवस्था करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

२६. **<u>दंड तरतुद :-</u>**

१. कंत्राटदाराने त्यांचेकडील सर्व कामगारांचा पोलीस तपासणी (पोलीस व्हेरीफिकेशन) अहवाल कार्यादेश मिळालेपासून ४५ दिवसांचे आत संस्थानला सादर न केल्यास प्रतिदिनी रुपये ५००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात/वसूल करणेत येईल.

२. कंत्राटदाराने आपलेकडील बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांना कार्यारंभ आदेश मिळालेपासून ०२ महिन्याचे आत कंपनीने उत्तम प्रशिक्षक नेमून त्यांचेमार्फत प्रशिक्षण वर्ग (Training) दयावे लागेल. सदर ट्रेनिग सुरु करणेपुर्वी इकडील विभागास अवगत करुन ट्रेनिंग पुर्ण झालेनंतर त्याचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा लागेल. तसे न केल्यास प्रतिदिनी रु.५००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात/वसूल करणेत येईल.

३. कंत्राटदारामार्फत काम करत असलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांना ०२ युनिफॉर्म, ओळखपत्र, डयुटीकार्ड कार्यारंभ आदेश मिळालेपासून ०१ महिन्याचे आत पुरविणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील व त्याकामी येणारा खर्च कंत्राटदारास स्वत: करावा लागेल तसे न केल्यास प्रतिदिनी रुपये ५००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात/वसूल करणेत येईल.

४. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे वेतन महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आत विहीत वेळेत संबंधीत कंत्राटी कर्मचा-यांचे बॅंक अकाऊंटमध्ये वर्ग करणे कंत्राटदारावर नियमाप्रमाणे बंधनकारक राहील. संस्थानकडून काही कारणास्तव बिलाची रक्कम ठेकेदारास आदा करणेस विलंब झाल्यासही देखील कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचे पेमेंट वाटप स्व:भांडवलातून विहीत मुदतीत म्हणजे महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत न केल्यास, ११ तारखेपासून ते पेमेंट वाटप होईपर्यंत प्रत्येक दिवसाला रुपये २,०००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासिक बिलातून वसूल/कपात करणेत येईल.

५. कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कामगारांचे दैनंदिन आगमन व निर्गमनावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वखर्चाने स्वतंत्र बायोमेट्रीक्स अटेंडन्स सिस्टीम बसविणे बंधनकारक राहील. तसेच संबंधीत कंत्राटी कर्मचा-यांना दरमहा पेमेंट स्लीप द्यावी लागेल. हे संबधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील तसे न केल्यास प्रतिमहा रु.५००/- दंड मासिक बीलातून कपात/वसूल करणेत येईल.

६. निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत सदर कंत्राटदाराने रितसर लेखी करारनामा रु.१,०००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व कायदयानूसार आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन, प्रॉव्हीडंट फंड नंबर, लेबर लायसन्स, सिक्युरिटी डिपॉझीट इत्यादी सर्व बाबींची कायदेशीर पुर्तता कंत्राटदारास ०१ महिन्याचे आत करावी लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत न केल्यास त्या पुढील तारखेपासून प्रतिदिनी रु.२००/- मात्र दंडाची रक्कम ठेकेदाराचे मागील बिलातून कपात करणेत येईल.

७. अन्नपाकीटासाठी तयार करणेत येणा-या पु-या मऊ असाव्यात. पुरी तळतांना तेलाचा ताव प्रमाणात ठेवून पुरी तळण्यात यावी, पाकीटातील पुरी कडक, जाड, जळालेली, गोल नसलेली आढळलेस प्रती पाकीट रु.२०/- प्रमाणे दंड आकारणेत येईल. याबाबत ठेकेदाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

२७. **विमा :-**

१. कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांस कामगार नुकसान भरपाई (वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट, १९२३) कायद्यान्वये नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्टचे तरतुदीस अनुसरुन कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे व सदर विमापॉलीसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे संबंधीत एजन्सीवर बंधनकारक राहील. दरम्यानचे काळात कंत्राटी कर्मचारी यांचे संदर्भात काही दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी किंवा नुकसान भरपाईची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

२. मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१४१ अन्वये, आपलेकडील सर्व बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख अपघात विमा पॉलिसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे, विमा पॉलिसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे व त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३. महाराष्ट्र शासन क्र.संकिर्ण-२०२२/६२३/प्र.क्र.१८०/का.१६ दि.२५ ऑगस्ट,२०२२ विधी व न्याय विभाग यांचे तसेच शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन, मंत्रालय यांचे दि.१३ जुलै, २०२२ रोजीचे परिपत्रकानूसार कामगार विमाबाबत व इतर अनुषंगीक सुचविलेली कार्यपध्दती अवलंबविणेत यावी.

२८. **प्रॉव्हीडंट फंड व ESIC :-**

१. एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड ॲन्ड मिसलिनीयस प्रोव्हीजन ॲक्ट,१९५२ नूसार कंत्राटदाराकडे भविष्यनिर्वाह निधीचा महाराष्ट्रातील रिजनल प्रॉव्हीडंट फंड कमिशनर ऑफीस अथवा नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर असणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर संबंधीत ॲथॉरिटीकडून घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. भविष्यनिर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या निविदाधारकाची निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदेसोबत प्रॉव्हीडंट फंड कोड ड्राफ्ट नंबरची प्रत सादर करणेत यावी.

२. कंत्राटी कर्मचारी हिस्सा प्राव्हीडंट फंड १२% व मालकाचा हिस्सा १३% ( प्रशासकीय चार्जेससह) अशा एकूण २५% प्रा.फंडाच्या रकमेचा भरणा तसेच कर्मचारी राज्यविमा निगम (ESIC) कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कंत्राटदाराने स्वत: करावायाचा आहे. व त्याबाबतची चलने व इतर अनुषंगिक कागदपत्रे संस्थानच्या प्रशासन शाखा वशी १० यांचेकडे विहीत मुदतीत जमा करावयाची आहे. त्यानंतर सदर प्राव्हीडंट फंड १३% मालकाचा हिस्सा व ESIC रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत करणे व प्राव्हीडंट फंड चलने, इतर अनुषंगीक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर करणे हे तुमचेवर नियमानुसार बंधनकारक राहील. त्याची तोषीस/झळ संस्थानला लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विलंबाबाबत दंडात्मक अथवा इतर कारवाई झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२९.कंत्राटदार व त्यांचेकडील बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार यांच्यात काही विवाद अथवा तंटा उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोषीस संस्थान प्रशासनाला लागणार नाही याची दक्षता घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३०.वेतन व इतर दरामध्ये कोणत्याही सबबीवर कंत्राटदारास अथवा त्याने पुरविलेल्या कंत्राटी कामगारास दरवाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. वेतन दराबाबत अथवा इतर कायदेशीर देणी देणेबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांची राहील.

३१.मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७, निर्णय क्रं.१४१ अन्वये, आपलेकडील सर्व बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख अपघात विमा पॉलिसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे सबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांस (वर्कमन कॉम्पेनसेशन अॅक्ट, १९२३) कायदयान्वये नुकसानभरपाई दयावयाची झाल्यास त्याबाबत संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३२.मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ चे कलम ६ (ब) ब नूसार प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे माहे जून व माहे डिसेंबर या महिन्याचे कंत्राटी कामगारांचे पगार पत्रकातून सर्व कंत्राटी कामगारांची नियमानूसार विहीत दराने वेलफेअर फंडाची वर्गणी (कामगार हिस्सा) कपात करुन, तसेच मालकाच्या हिश्याची वेलफेअर फंडाची वर्गणी कंत्राटदाराने स्वत: जमा करावयाची आहे व अशा कामगार तसेच मालक वर्गणीच्या एकत्रीत रक्कमेचा भरणा प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे १५ जुलै व १५ जानेवारी पुर्वी चेक/डिमांड ड्रॉफ्टव्दारे मुंबई कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेणू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०० ०१३ यांचेकडे विहीत विवरणपत्रासोबत कंत्राटदाराने करावयाचा आहे. सदर कामगार कल्याण निधी भरणा करणेची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कल्याण निधी वर्गणी संदर्भात कुठलीही रक्कम कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणार नाही.

३३.कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकॉर्ड कॉन्ट्रक्ट लेबर अॅक्टप्रमाणे ठेकेदारास विहीत नमुन्यात ठेवावे लागेल, ते कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कामगारांचे वेतनाबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३४.कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगारांचे, कामगार कल्याण निधी, व्यवसायकर, आयकर, टी.डी.एस., वेतनवाढ, वर्कमेन कॉम्पेनसेशन, घरभाडे भत्ता, पगारी सुट्टया, पगारी रजा, ई.एस.आय.सी. कॉन्ट्रीब्युशन, उपदान (ग्रॅच्युइटी), जीएसटी व इतर आर्थिक बाबी अपघाती जीवीत इ.सबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायद्याचे तरतुदीनूसार कंत्राटदारावर राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार रहाणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३५.कंत्राटदारामार्फत संस्थानला पुरविणेत येणा-या अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानूसार महाराष्ट्र शासनाचे शॉप अॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०२ प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, (वर्षातुन ०२ वेळा होणारे वाढीसह) महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौंन्स व सानुग्रह अनुदान-८.३३% (प्रत्येक वर्षी दिपावली सणाचे वेळी), व इतर सर्व प्रकारची आर्थिक देणी देणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. भविष्यात झोनमध्ये काही बदल झाल्यास होणारे फरकाची रक्कम स्वतंत्र आदा करणेत येईल.

३६. कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी कामगारासंबंधी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९७१, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८, व इतर सर्व औद्योगिक तसेच कामगार कायदयांच्या तरतुदींचे पालन करण्याची व त्यानूसार विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया आवश्यक ते सर्व रेकॉर्ड, दस्तऐवज ठेवण्याची व सबंधीत ॲथॉरिटीला विवरण पत्रे पाठविण्याची, त्याबाबत वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३७. कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांचे संदर्भात ठेवावयाचे सर्व प्रकारचे रेकॉर्डस, दस्तऐवज उदा.कंत्राटी कामगारांची प्रत्येक महिन्याची बिले, हजेरी रजिस्टर, पगारपत्रके, यादया, विवरणपत्रे, प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हीस टॅक्स, कामगार कल्याण निधी, इत्यादी संदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया अचुक व परिपुर्ण ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३८. या कामासाठी लावणेत येणा-या कामगारांची वैद्यकिय तपासणी संस्थानमार्फत संस्थानचे रुग्णालयात निशुल्क करणेत येईल. संस्थानने ठरवून दिलेल्या वेळेत वैद्यकिय तपासणी करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३९. कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नूसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर यांचे कडून लेबर लायसेन्स व केटरींग परवाना घेऊन त्याची प्रत संस्थानचे निविदा फॉर्म भरलेनंतर ऑनलाईन जोडणे बंधनकारक राहील.

४०. सदर काम उक्ते टेंडर पध्दतीचे असल्याने सदरचे कामासाठी कॉन्ट्रॅक्टरकडून लावलेले कामगार व त्यांचे अन्य सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरु शकणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कंत्राटी कामगारांचा संस्थानशी कुठल्याही प्रकारे मालक-नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही.

४१. ज्या निविदाधारकाची निविदा मान्य करण्यात येईल त्यास संस्थानकडे एकूण वार्षिक कामाच्या रकमेच्या ३% रक्कम सुरक्षा अनामत (Security Deposit) म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम कार्यादेश मिळालेनंतर १५ दिवसांचे आत भरणे बंधनकारक राहील. निविदेत नमूद केलेल्या कामाबद्दल कोणतीही तक्रार नसेल तर सुरक्षा अनामत रक्कम निवीदा कालावधी संपलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

४२. सदर कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिल्यानंतर, कंत्राटदारास याकामी उपकंत्राटदारास काम देता येणार नाही. असे आढळल्यास सदर कॉन्ट्रॅक्ट रदद करणेत येवून योग्य ती कारवाई करणेत येईल.

४३. उपरोक्त कामाचा करारनामा नोंदणीकृत करणेसाठी येणारा खर्च निविदाधारक/पुरवठादार यांना करावा लागेल.

४४. कंत्राटदारास संस्थानला तिन महिने पूर्वसुचना न देता काम बंद करता येणार नाही. पर्वूसूचना न देता कंत्राटदाराने काम बंद केलेस /संस्थानला भक्तांना सेवा पुरविणेस अडचणी निर्माण झाल्यास कंत्राटदाराचे कंत्राट रदद करुन त्याची अनामत रक्कम संस्थानखाती जमा करण्यात येईल तसेच कंत्राटदाराचे नाव काळया यादी (Black List) टाकण्यात येईल त्याबाबत कंत्राटदारास तक्रार करता येणार नाही.

४५. अन्नपाकीटाची व अन्नपाकीटातील पदार्थांची प्रत (क्वालिटी) समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास महिन्याचे एकूण बिलापोटी ५% पर्यंत दंडात्मक कारवाई करणेत येईल.

४६.या कामासाठी लावलेल्या कामगारास अपघात झाल्यास त्या अपघाताची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. संबंधीत कामगारास संस्थानकडून मोफत वैद्यकिय मदत/आर्थिक सहाय्य (नुकसान भरपाई) मागण्याचा अधिकार राहणार नाही.

४७.साईभक्तांसाठी दररोज सरासरी ८,००० ते १२,००० अन्नपाकीटे बनवावे लागतात. गर्दीमध्ये वाढ झाल्यास गर्दीचे प्रमाणात जास्त अन्नपाकीटे बनविणे गरजेचे असल्यामुळे निविदेसोबत अनुभवाचे दाखले म्हणून यापूर्वी मोठया प्रमाणात केलेल्या व करीत असलेल्या कामाबाबत त्या मालकांच्या/संस्थेच्या कार्यादेशाच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

४८.अन्नपाकीटे तयार करतांना चांगल्या प्रकारची स्वच्छता, कामाची गती वाढविणे व आरोग्याला उपकारक पध्दती वापरणेसाठी ॲटोमॅटीक मशिनरी घेणे संस्थानचे विचाराधीन आहे. मशिनरी खरेदी केल्यामुळे कंत्राटदाराचे काही प्रमाणात अथवा पुर्णतः काम बंद झाल्यास त्याबाबत कंत्राटदारास आक्षेप घेता येणार नाही.

४९.कॉन्ट्रॅक्ट मुदतीत अन्नपाकीटे तयार करणेकामी मशिनरीज उपलब्ध झाल्यानंतर सध्याचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे व त्यापुढील कालावधीसाठी नविन दर ठरविणेसाठी विहीत पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

५०.दरपत्रक भरतांना टेंडर कालावधीत किमान वेतन ॲक्टनूसार वेतन आदा करण्यासाठी सदर कालावधीत वेळोवेळी वेतन दरात होणारी वाढ विचारात घेणे, दिपावलीचे वेळी सानुग्रह अनुदान देणेसाठी रकमेची तरतुद करणे, प्रॉव्हीडंड फंड, (मालकाचा हिस्सा) व ई.एस.आय.सी (कर्मचारी राज्य बिमा निगम) यांचेकडील सर्व नियमांची तरतुद करणे गरजेचे आहे. एकदा नाष्टापाकीटाचे दर मान्य झाल्यानंतर वरील कामासाठी कंत्राटदाराची कोणत्याही प्रकारची अडचण/तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५१.गर्दीचे प्रमाणात अन्नपाकीटे तयार करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. गरजेप्रमाणे अन्नपाकीटे तयार करुन देण्यास कंत्राटदार असमर्थ ठरल्यास दुस-या कंत्राटदाराकडून अन्नपाकीटे तयार करुन घ्यावी लागल्यास त्याकामी येणारा वाढीव खर्च मुळ कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील किंवा गर्दीचा अंदाज न घेता अनावश्यक अन्नपाकीटे तयार करुन दिल्यामुळे जादा प्रमाणात शिल्लक राहुन संस्थानचे नुकसान झाल्यास होणारे नुकसान कंत्राटदाराचे बीलातून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

५२.अन्न सुरक्षा मानके कायदा-२००६ आणि नियम-२०११ व ISO-22000-2018 चे नियमानूसार ठेकेदार यांनी अन्नपाकीटे बनविणेकामी असणारे स्त्री कामगार यांना डयुटी वेळेत गळयातील मंगळसूत्र सोडून इतर अलंकार, हातातील बांगडया, अंगठी, नेलपेंट तसेच पुरुष कामगारांनी हातात कडे/धागे/अंगठी वगैरे वस्तू वापरणेवर प्रतिबंध राहील. तसेच पुरुष कामगारांनी वेळेचे वेळी केस कापणे, दाढी करणे,कटींग करणे,नखे कापणे इ.बंधनकारक राहील.

५३.अन्नपाकीटे किचन येथे निविदाधारक यांनी त्यांचेकडील कामगारांना, किचनमध्ये वापरणेसाठी स्लीपर/रबरी चप्पल/गमबुट स्वखर्चाने द्यावे लागेल.

५४.अन्नपाकीटे बनविणेकामी एक किंवा अनेक ठेकेदारांची नियुक्ती करणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे.

५५.अन्नपाकीटे बनविणेकामी लागणारे किरकोळ साहित्य उदा.कौचे, झारे, तेल काढणेकामी स्टे.स्टील मग वगैरे साहित्य निविदाधारक यांनी स्वखर्चाने आणून वापरावयाचे आहे. तसेच संस्थानने अन्नपाकीटे बनविणेकामी दिलेली भांडी, कढई, ट्रे, क्रेटस् इ.साहित्य वेळचे वेळी घासून स्वच्छ/साफ करावे लागतील.

५६.सदर ई-निविदातील TDS वजावटी व GST कायदयान्वये वेळोवेळी होणा-या बदलानूसार TDS व GST लागू राहील. याची कंत्राटदाराने नोंद घ्यावी.

५७.संस्थानने अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनविणेकामी दिलेले भरलेल्या तेलाचे डबे रिकामे झालेनंतर त्यामधील तेल संपुर्णत: निथळून घेवून, डब्यातील संपूण तेल काढून संस्थानने ठरवून दिलेल्या जागेवर रचून ठेवावे. तसे न झाल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.

५८.दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत, ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेचे रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगारपत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) सादर कराव्या लागतील.

५९.सदरहु कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर ठेकेदारावर महाराष्ट्र शासनाने तसेच संस्थान व्यवस्थापनाने घालून दिलेल्या कोव्हीड-१९ चे संपुर्ण नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६०.भविष्यात काही नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा कोव्हीड-१९ मुळे श्री साई प्रसादालय बंद करणे भाग पडल्यास, ज्या दिवसापासून ठेकेदाराचे काम बंद करणेत येईल त्या दिवसापासून ठेकेदाराकडील कामगार देखील बंद करणेत येईल. त्यामुळे सदरहु टेंडरचे काम बंद असल्यास ठेकेदाराकडील कामगारांचा पगार करणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

६१. **संस्थान मार्फत पुरविण्यात येणा-या सुविधा**:- उपरोक्त कामासाठी लावलेल्या कर्मचा-यांचे एकवेळचे भोजन व चहाची व्यवस्था संस्थान तर्फे विनामुल्य केली जाईल. मात्र निवास व्यवस्था कंत्राटदाराने स्वत: स्वखर्चाने करावयाची आहे. संस्थानकडून विज, पाणी, गॅस भट्टी, मोठाले भांडी इ.पुरविणेत येईल.

६२.**निविदाधारकाचे नाव काढून टाकणे**

क) संबंधित विभाग प्रमुख निविदाधारकाचे नांव संस्थानचे यादीतून काढून टाकण्यासाठी सक्षम राहतील, जर निविदाधारक –

ख) एखादा करार कार्यान्वित करण्यास अपयशी ठरल्यास किंवा तो समाधानकारकरित्या कार्यान्वित करण्यास अपयशी ठरल्यास;

ग) कर्मचा-यांची देणी वेळेवर अदा न केल्यास ;

घ) संस्थानने अदा केलेली GST रक्कम विहीत वेळेत शासनाकडे भरणा न केल्यास.

६३.ई-निविदा मधील अटी शर्तीचा व कागद पत्रांचा अभ्यास करुन ई-निविदा सादर करावी. ई-निविदे-संबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कार्यालयात दूरध्वनी क्र.- (०२४२३) २५८८४४ /२५८८२३ /२५८८२७ वर संपर्क करावा.

६४.सदर कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिल्यानंतर कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट मुदत संपल्यानंतर ताब्यात दिलेले डेडस्टॉक साहीत्य कमी आढळल्यास त्याची भरपाई रक्कम अंतिम बीलातून किंवा अनामत रक्कमेतून कपात केली जाईल.

६५.सदरच्या व्यवहाराबाबत काही वाद उपस्थित झाल्यास कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास उभय पक्षकारांना सदरचा वाद हा मा.सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन/सिनियर डिव्हीजन, राहाता कोर्ट, मा.जिल्हा व सत्र न्यायालय, राहाता, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, या न्यायालयाचे अधिकार कक्षेत उपस्थित करता येईल. अन्य कोर्टात वाद दाखल करता येणार नाही.

६६.कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे आवश्यकतेनुसार वेळोवेळी गर्दीचे जादा कर्मचारी कामास लावून अन्नपाकीटे पुरवावी लागेल.

६७.**उत्सव :** श्री साईबाबांचे श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सव हे तीनही उत्सव मोठया उत्साहाने साजरे करण्यात येतात. उत्सव कालावधीत प्रसादभोजनामध्ये भक्तांना मिष्टान्न पदार्थ तयार करुन देण्यात येतात. सदरचे मिष्टान्न पदार्थ तयार करुन देण्याचे काम अन्नपाकीटे ठेकेदार, चपाती/पुरी ठेकेदार, लाडू विभागाकडील लाडू व बर्फी ठेकेदार या चारही ठेकेदारांनी एकमेकाच्या संगनमताने विनामुल्य करुन दयावयाचे आहेत. तसेच उत्सवानिमीत्त कामगारांना देण्यात येणारे बुंदीप्रसाद व चिवडा प्रसाद पाकीटे (अंदाजे ७ ते ८ हजार) तयार करुन देणे बंधनकारक राहील.

६८. उत्सवानिमीत्त कामगांराना देण्यात येणा-या श्रमपरिहार भोजनातील मिष्टान्न पदार्थ आपणास करुन देणे बंधनकारक राहील. त्यासाठी लागणारा कच्चा माल उदा. किराणा साहीत्य तेल, तुप वगैरे तसेच भांडी वीज, पाणी इत्यादी सर्व साहीत्य संस्थानकडून पुरविणेत येईल.

**त्यामुळे या सर्व बाबी विचारात घेवूनच निविदाधारक यांनी प्राईस बीडमध्ये दर (BOQ) दयावयाचे आहेत. दर देतांना जी.एस.टी वगळून द्यावयाचे आहे. जीएसटीची रक्कम संस्थानकडून आदा करणेत येईल.**

६९.**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम-१९५२ नुसार कंत्राटदाराने खालील बाबींची / कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक आहे.**

१. कंत्राटदाराचे आस्थापनेस प्रॉव्हिडंट फंडाचा स्वत:चा स्वतंत्र कोड क्रमांक असणे आवश्यक असून त्याबाबत प्रॉव्हीडंट फंड कोड क्रमांक वाटप पत्राची (Allotment of code number letter) सत्य प्रत दयावी लागेल.

२. सुरुवातीस या कामाकरीता घेतलेले लेबर लायसन्सची प्रत अथवा त्याबाबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत व संस्थान कामाकरीता घेतलेले लेबर लायसन्स मधील कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी कामास नेमले असतील तर प्रत्यक्षात किती कामगार नेमले याबाबतचे लेटरहेडवर दरमहा पत्र द्यावे लागेल .

३. कंत्राटदाराने सदर कामाकरीता नेमलेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी संबंधीत दैनंदीन, मासिक, वार्षिक इ.ऑनलाईन विवरणपत्रे तसेच विहीत वेळेत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४. दरमहा भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेनंतर संबंधीत कर्मचा-यांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक, ऑनलाईन ईसीआर, ऑनलाईन चलन व संबंधीत चलनाचा ऑनलाईन भरणा केलेबाबतची Payment Confirmed Slip (TRRN Details) इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) वेळेत सादर करावे लागतील.

५. कंत्राटदारास ज्या विभागाने काम दिलेले आहे त्यांचे अहवालावरुन कामाचा कालावधी निश्चीत करण्यात येईल व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे.

६. कंत्राटदाराने काम केलेला महिना संपलेनंतर पुढील महिन्याचे १५ तारखेपुर्वी भविष्य निर्वाह निधीचे रकमेचा भरणा करुन संबंधीत कागदपत्रे त्याच महिन्यात तातडीने सादर करावी लागतील.

७. कंत्राटदाराने त्यांचेकडील संस्थानचे शिर्डी साईटवरील कामगारांची होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांचे स्वत:चे पी.एफ.कोड क्रमांकावर स्वतंत्र चलनाने भरावयाची आहे.

८. प्रत्येक महिन्याचे बीलावर, मागील महिन्यातील भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा भरणा केलेबाबत सामान्य प्रशासन कार्यासन १० अ कडून अभिप्राय देण्यात येतो. रक्कम भरुन कागदपत्रे सादर केलेशिवाय अभिप्राय देता येत नाही. सबब कंत्राटदाराने विहीत वेळेत प्रॉ.फंड भरणा करुन कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

९. उपरोक्त प्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेस कंत्राटदारास विलंब झाल्याने कंत्राटदाराचे बील प्रलंबीत राहीलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१०.संस्थानकडील कंत्राट संपलेनंतर कंत्राटदार यांचेकडील शिर्डी साईटवरील कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणेची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७०. **ई-निविदेच्या ऑनलाईन टेक्नीकल बीडसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे स्कॅन करुन विहीत मुदतीत अपलोड करावीत.**

**१. कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नूसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त, यांचे कडून लेबर लायसन नंबर व Valid असल्याची छायांकित प्रत.**

**२. अन्न औषध प्रशासन, यांचेकडील अद्ययावत केटरींग फुड परवाना.**

**३. प्राव्हीडंड फंड कोड नंबरची छायांकित प्रत.**

**४. पॅन कार्डची छायांकित प्रत.**

**५. सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल रु.१० लाख किंवा त्यापेक्षा जास्त उलाढालीचे सनदी लेखापालाने दिलेले प्रमाणपत्र.**

**६. जी.एस.टी रजिस्ट्रेशन नंबरची छायांकित प्रत.**

**७. कामाचे अनुभवाचे दाखले**

**श्री साईबाबांचे शुभाशीर्वादासह,**

(गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

## अधिकार प्रदान पत्र

- **कंपनीचे नांव** :-
- **कंपनी रजिस्ट्रेशन नंबर** :-
- **कंपनीचा कायमचा पत्रव्यवहार पत्ता** :-
- **फोन नंबर/ मोबाईल नंबर** :-
- **ई-मेल आय डी** :-
- **अधिकार प्रदान करणा-या कंपनी अधिका-याचे/मालकाचे नांव** :-
- **अधिकारी पदान करण्यात आलेल्या व्यक्तीचे नांव व हुद्दा** :-

मी खालील सही करणार श्री ---------------------------------------------------------- असे घोषित करतो की मी / माझ्या कंपनीने संस्थानचे प्रसादालयाकरीता अन्नपाकीटे तयार करणेच्या कामाकरीता संस्थान नियमाप्रमाणे ई-निविदा प्रक्रियेत सन २०२५-२६ या वर्षासाठी भाग घेतला आहे. त्यात माझी निविदा मंजूर झाल्यास संस्थानशी पत्रव्यवहार व ई-निविदेसंबंधीत/कामासंदर्भात कार्यवाही करणेकरीता मी माझ्या/ कंपनीच्या वतीने श्री ---------------------------------------------------------- वय- वर्षे पदनाम ---------यांना उपरोक्त कामा संबंधी माझ्या वतीने / कंपनीच्या वतीने संस्थानशी करारनामा करणे, कार्यादेश, नोटीसा घेणे व त्याअनुषंगिक कामे करण्यासाठी सदरहु कामाची निविदा / कार्यादेशाचा कालावधी समाप्त होईपावेतो अधिकार प्रदान करीत आहेत.

या अधिकार प्रदान पत्रानंतर संबंधीत व्यक्तीने माझ्या / कंपनीच्या वतीने केलेले कोणतेही कृत्य, पत्रव्यवहार, आर्थिक व्यवहार हा माझ्या / माझ्या कंपनीचा व्यवहार असेल. अशी या प्रपत्राव्दारे मी / आम्ही घोषित करतो व श्री --------------------------------------------------- यांना कंपनीचे वतीने अधिकार प्रदान करतो.

**कंपनीचे/मालकाचे नांव व सही**
**अधिकार प्रदान करणा-या**

**शिक्का**

**अधिकार देण्यात आलेल्या**
**व्यक्तीचे नांव व सही**

**(सदर प्रपत्र कंपनीचे लेटरहेडवर भरुन विहीतह मुदतीत अपलोड करावेत.)**

## परिशिष्ट – 'अ'

### श्री साई प्रसादालय

### अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी ई-निविदा

**(सदरची माहीती भरुन निविदाधारकाने टेक्नीकल बीडसोबत स्कॅन करुन जोडावयाची आहे.)**

---

### निविदाधारकाची माहीती

०१) निविदा धारकाचे नांव - ------------------------------------------------

०२) पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता - ------------------------------------------------

०३) फोन क्रमांक - ------------------------------------------------

कार्यालय - ------------------------------------------------

निवास - ------------------------------------------------

फॅक्स नंबर - ------------------------------------------------

मोबाईल नंबर - ------------------------------------------------

ई-मेल - ------------------------------------------------

०४) संपर्कासाठी अधिका-याचे नांव - ------------------------------------------------

फोन क्रमांक - ------------------------------------------------

०५) मालकाचे/भागीदारांची नांवे - १) ------------------------------------------------

२) ------------------------------------------------

०६) ठेकदारीचा नोंदणी क्रमांक - ------------------------------------------------

०७) सध्याचे लेबर लायसन्स नंबर - ------------------------------------------------

०८) प्राव्हीडंड फंड कोड नंबर - ------------------------------------------------

०९) जी.एस.टी नंबर - ------------------------------------------------

१०) व्यवसाय कर नोंदणी नंबर - ------------------------------------------------

११) कर्मचा-यांची एकूण संख्या - ------------------------------------------------

१२) आयकर पॅन नंबर - ------------------------------------------------

१३) बॅंक खाते नंबर - ------------------------------------------------

आय.एफ.सी कोड - ------------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

---

(कार्यालयीन कामकाजाकरीता)

## परिशिष्ट – 'ब'

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता निविदाधारकाने द्यावयाचे पत्र.**
**(ई-निविदाधारकाने सदरचे पत्र स्वत:चे लेटरहेडवर तयार करुन टेक्नीकल बीडसोबत जोडावयाचे आहे)**

दिनांक :- / /२०२५

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी
यांसी,

**विषय :- अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करुन देणे बाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, आपण वृत्तपत्रात वरील विषयाबाबत प्रसिध्द केलेली निविदा सुचना वाचली. आपल्या ऑनलाईन ई-निविदेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत. आपल्या सर्व अटी-शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) प्रमाणीत आकाराचे/वजनाचे आवश्यकते नुसार सर्व प्रक्रीयासह तयार करुन देण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारण्याची हमी मी/आम्ही देत आहोत. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांचे हजेरी रजिस्टर पगारपत्रक, पी.एफ कागदपत्रे वगैरे संबंधित रेकॉर्ड विहीत नमुन्यात ठेवून त्यांचा भविष्य निर्वाह निधी ॲक्ट १९५२ नुसार करावयाची पुर्तता तसेच इतर अनुषंगिक सर्व कायदेशीर पूर्तता त्याचप्रमाणे जी.एस.टी भरणेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर / आमचेवर राहील.

मी/आम्ही आमची निविदा मंजूर झाल्यास रु.१,०००/- चे गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देवू. तसेच कामाच्या एकूण वार्षिक रकमेच्या ३% प्रमाणे रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून कार्यादेश मिळालेनंतर १५ दिवसाचे आत जमा करण्याची हमी घेत आहोत. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही याची आम्हाला पुर्ण कल्पना आहे. उपरोक्त काम एक वर्ष अखेर तथा निविदेतील अटी/शर्ती नूसारचे कालावधीपर्यंत करणे माझेवर/आम्हावर बंधनकारक राहील.

**आपला / आपले विश्वासू**

**शिक्का**

**सही / सहया**